# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पाटण महोत्सवामुळे रोजगार निर्मितीला चालना मिळेल : विक्रमसिंह पाटणकर

▲पाटण, दि. २८ : महाविद्यालयीन विद्यार्थी शिक्षण घेत असताना करिअर घडविण्यासाठी योग्य मार्गदर्शनाच्या शोधात असतो. त्याला पाटण महोत्सवातील विविध स्टॉल हे योग्य मार्गदर्शन करण्यास फायदेशीर ठरतील. त्यातून त्यांनी प्रेरणा घेऊन आपला स्वतःचा व्यवसाय निर्माण करावा. या पाटण महोत्सवामुळे रोजगार निर्मितीला चालना मिळेल. विद्यार्थ्यांनी रोजगार मागण्यापेक्षा रोजगार निर्मिती देणारे झाले पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.



उद्घाटनप्रसंगी विक्रमसिंह पाटणकर, समवेत डॉ. दायानंद मस्के, अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, डॉ. विलास कळंत्रे, डॉ. हेमलता काटे व इतर. (नितीन खैरमोडे)

येथील पाटण महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, दादासाहेब जाधव, शरद देशमुख, पृथ्वीराज पाटील, कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे, डॉ. हेमलता काटे, नगराध्यक्षा सौ. अनिता देवकांत आणि पाटण महोत्सव समितीचे सदस्य उपस्थित होते.

माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, छोट्या-छोट्या उद्योगातून मोठा उद्योग निर्माण होत असतो. सुरुवातीला लहान उद्योगांपासून सुरुवात करावी. स्वयंनिरीक्षण, अनुभव यातून आपला नवीन उद्योग उभा करावा. उद्योग वाढवून आपल्यासोबत समाजाची प्रगती करावी. उद्योगाच्या माध्यमातून रोजगार कसा निर्माण होईल याकडे देखील आपण लक्ष दिले पाहिजे. पाटण तालुक्यात वन पर्यटनामध्ये मोठी संधी आहे. स्थानिक युवकांनी याचाही फायदा करून घ्यावा. या पाटण महोत्सवातील सर्व स्टॉलला भेट देऊन नवीन तंत्रज्ञान, शेती, गृह उद्योग, लघुउद्योग यातून आपल्याला साजेसा असा उद्योग उभा करावा आणि त्यातून परिसरातील अनेकांना रोजगार निर्माण कसा होईल याकडे कटाक्षाने पहावे. या पाटण महोत्सवाच्या माध्यमातून संधीचे आपण सोने करून नवीन उद्योग उभा करून युवकांना रोजगार निर्माण कराल. या तीन दिवसाच्या पाटण महोत्सवात आपल्या परिसरातील सर्व विद्यार्थी, शेतकरी, महिला यांना आवर्जून भेट देण्यासाठी सांगा. या आलेल्या संधीचा फायदा आपण घ्यावा, असे आवाहन देखील त्यांनी केले.

पाटण महोत्सवाच्या उद्घाटनानंतर माजी मंत्री विक्रम सिंह पाटणकर यांनी महोत्सवातील प्रत्येक स्टॉलला भेट दिली. शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक, बचतगटांच्या स्टॉलला भेट देवून विचारपूस करून विविध उपकरणे, खाद्य पदार्थांची माहिती घेतली. याशिवाय अनेक स्टॉलला मार्गदर्शनही केले. यावेळी विद्यार्थी, तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, परिसरातील शेतकरी, महिला उपस्थित होत्या.